



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात...
म्हणूनच देव अश्या लोकांनाच
जास्ती निर्माण करतो...
– अब्राहम लिंकन


वर्ष : ०५ | अंक : ७४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२८ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## मुंबईचे गेटवे आता 'गेटवे ऑफ द वर्ल्ड' बनवण्याच्या दिशेने वाटचाल - अमित शाह



**अक्षराज : श्रीकांत जाधव**

**दि.२७, मुंबई :** वाढवण बंदर लवकरच जगातील टॉप १० बंदरांमध्ये गणले जाणार आहे. ग्रेट निकोबार व कोचिन बंदरात नव्या गुंतवणुकीची प्रक्रिया सुरू आहे. मच्छीमारांच्या सुरक्षेसाठी सरकार ठोस उपाययोजना केल्या आहेत. जागतिक गुंतवणूकदारांनी भारताच्या सागरी क्षेत्रात सहभागी होऊन आपल्या आणि भारताच्या समृद्धीचा मार्ग प्रशस्त करावा.

मुंबईचे गेटवे आता गेटवे ऑफ द वर्ल्ड बनवण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी येथे केले. तर मुंबई ही देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

गोरेगाव नेस्को येथे आयोजित 'इंडिया मेरीटाईम वीक– २०२५' या आंतरराष्ट्रीय सागरी परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी शाह यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

उद्घाटन सोहळ्यास केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन शरण मांझी, केंद्रीय राज्यमंत्री शंतनु ठाकूर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि केंद्रीय सचिव विजय कुमार, आदी मान्यवर उपस्थित होते.

इंडिया मेरीटाईम वीक २०२५'च्या निमित्ताने आज जगभरातील सागरी तज्ज्ञ, उद्योगपती आणि प्रतिनिधी भारतात एकत्र आले आहेत.

आपल्या भाषणात शाह पूढे असेही म्हणाले की, भारताचा ११ हजार किलोमीटरचा किनारा आता जागतिक विकास केंद्र होत आहे. सागरी क्षेत्र देशाच्या 'जीडीपी'त ६० टक्क्यांहून अधिक योगदान देते. पाच हजार वर्षांपूर्वीपासून भारत सागरी व्यापारात अग्रस्थानी होता. आज इंडो–पॅसिफिक क्षेत्रात भारत पुन्हा आपली सागरी ताकद सिद्ध करत आहे. सागर, सागरमाला, गतिशक्ती आणि समुद्रयान यासारख्या प्रकल्पांमुळे सागरी पायाभूत सुविधांना नवे बळ मिळाले आहे. भारत जहाजबांधणीत जगात पाचव्या क्रमांकावर असून नवीन बंदरांचीही उभारणी वेगाने सुरू असल्याचे ते म्हणाले.

**मुंबई देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू - मुख्यमंत्री**

भारत आणि महाराष्ट्राकडे विविध क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत नव्या 'मेरीटाईम पॉवर'च्या रूपात उभा राहत आहे. महाराष्ट्र देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू आहे असे सांगून या प्रवासात गुंतवणूकदारांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सागरी ताकदीत महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. मुंबई पोर्ट आणि जेएनपीए देशाच्या कंटेनर वाहतुकीत मोठी भूमिका बजावत आहेत. यात मुंबईसह, महाराष्ट्रातील बंदरांची भूमिकाही सदैव महत्वाची राहिली आहे. यातूनच मुंबईला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा मिळाला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.


## भाजीविक्रेत्या महिलेवर काळाचा घाला !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, कोल्हापूर :** संकेश्वर–गडहिंग्लज महामार्गावरील शेरी ओढ्यानजिक चारचाकी आणि रिक्षाचा भीषण अपघात झाला. अपघातात रिक्षातील शेतकरी भाजी विक्रेत्या महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. रविवारी झालेल्या या अपघातात रिक्षा आणि कारमधील मिळून आठ जण जखमी झाले आहेत. या अपघातात मृत्यू झालेल्या महिलेच्या कुटुंबीयांचा आक्रोश मन हेलावणारा होता. त्यांच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी कार चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत महिलेचं नाव शोभा ढुंडाप्पा जरळी (वय ५८, रा. निलजी, ता. गडहिंग्लज) असं असून त्या शेतकरी असून दररोज शेतातील भाजीपाला विक्रीसाठी प्रवासी रिक्षातून गडहिंग्लज बाजारात येत असत. रविवारी दुपारीही त्या भाजी घेऊन शहरात येत असताना काळाने त्यांच्यावर झडप घातली.

# उद्धव ठाकरेंचा निवडणूक आयोगावर घणाघात!



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** आज मुंबईतल्या वरळी डोममध्ये उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा निर्धार मेळावा पार पडला. या मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी झंझावाती भाषण केलं आहे. त्यांनी भाजप, मोदी– शाहांवर जोरदार टीका केली आहे. त्याचवेळी त्यांनी भारताच्या निवडणूक आयोगालाही गर्भीत इशारा दिला आहे. हुकूमशाही आणायची असेल तर हीच वेळ आहे, निवडणूक आयोगाला परत एकदा सांगतो, चुका दुरुस्त केल्याशिवाय तुम्हाला निवडणूक घेता येणार नाही, अशा शब्दांत ठाकरेंनी आयोगाला सुनावलं आहे.

**उद्धव ठाकरे नेमकं काय म्हणाले?**

उद्धव ठाकरेंनी या भाषणात भाजप आणि निवडणूक आयोगाला टार्गेट केलेलं पाहिलेलं मिळालं आहे. त्यांना ओरबाडायचं आहे. संपवून टाकायचं आहे, यासाठी त्यांना सत्ता हवी आहे. आपल्यावर जर हुकूमशाही नको असेन तर हीच वेळ आहे.निवडणूक आयोगाला परत सांगतो, चुका दुरुस्त केल्याशिवाय तुम्हाला निवडणुका घेता येणार नाहीत. आम्ही दोन आयुक्तांना भेटलो, त्यांनी आम्हाला राज्य निवडणूक आयोगाकडे जाण्यास सांगितलं. आम्ही दोघांना एकत्र भेटलो, असंही उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं आहे. या मुद्दावर ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, लोकसभेमध्ये यश मिळालं, विधानसभेत २० जागा? हरू शकतो आपण. मी कोव्हिडमध्ये मुस्लिमांसह सर्वांबरोबर समानतेने वागलो. तो मतदार माझ्याशी उरफाटा वागून शकत नाही. हा मतदारांचा कौल नाही. हा यांच्या पैशांचा माज आहेय उद्या यांचे चटर फटर लोक चिरकतील, चिरकू द्या, उत्तरं देऊ नका. त्यांना त्याचा पगार मिळतो. ते आपल्याला डिस्टर्ब करतात. ते नामर्द आहेत म्हणून आपल्याच लोकांना तोडून फोडून आपल्यावर पाठवत आहेत. आपल्याच दोन माणसांमध्ये भांडणं लावत आहेत. ही भाजपची अवसानघातकी पद्धत आहे.

अंधभक्तांना सांगतो डोळ्यांवर पट्टी घालून जाऊ नका. पट्टी उघडेल तेव्हा कळेलं, घराण्याचं घराणं खाईत पडलेलं असेल. निवडणूक यादीमध्ये दोन गोष्टी असतात. फ्रॉड आणि फॉल्स. चूक होऊ शकते, पण हा फ्रॉड आहे. असा घणाघात यावेळी उद्धव ठाकरेंनी निवडणूक आयोगावर केला आहे. उद्धव ठाकरेंनी अमित शाहांच्या मुंबई दौऱ्यावरही जहरी टीका केली आहे. त्यांनी अमित शाहा हे ॲनाकोंडा आहेत, असं म्हणत मुंबईवर दोन व्यापाऱ्यांचा डोळा आहे, असं म्हटलं आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १ हजार ३५२ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, सातारा :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फलटण येथे नीरा देवघर प्रकल्पाच्या उजवा मुख्य कालव्याच्या दुसऱ्या टप्प्याच्या शुभारंभासह १ हजार ३५२ कोटी रुपये रकमेच्या विविध विकासकामांचे ऑनलाइन भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. फलटण शिंगणापूर रस्त्यावरील नाईकबंबवाडी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमध्ये एक मोठा (मेगा) औद्योगिक प्रकल्प देण्यासह तालुका व परिसरातील विविध विकास कामे सुरू करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

फलटण येथे आयोजित भूमिपूजन कार्यक्रम व शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आदी उपस्थित होते.

फलटण ही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भूमी असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शासनाने या परिसराला दुष्काळमुक्त करण्यासाठी नीरा देवघर कालव्याच्या कामातील अडचणी दूर करून कामाला सुरुवात केली आणि प्रकल्पाचे पाणी फलटण आणि माळशिरसला देणे शक्य करून दाखविले आहे. माणदेशाच्या साहित्यात दुष्काळावरील चित्रण दिसून येते, हा दुष्काळ दूर करण्याचे काम शासनाने हाती घेतले असून सर्व कामे पूर्ण झाल्यावर हरित माणदेश तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**दुष्काळमुक्ती हाच ध्यास !**

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, नीरा देवघर, जिहे कटापूर, टेंभू उपसा योजनेचे वेगवेगळे टप्प्यातून दुष्काळी तालुक्यांना पाणी दिले आहे. सांगोल्यासारख्या दुष्काळी भागात पाणी पोहोचविण्यात आले आहे. माळशिरस तालुक्यातील पाण्यापासून वंचित २२ गावांना पाणी देण्यात येईल. नीरा देवघर



प्रकल्पातील तीन उपसा सिंचन योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. या परिसराच्या विकासासाठी आणि दुष्काळमुक्तीसाठी शासन येथील जनतेच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

**फलटण परिसराचा सर्वांगीण विकास करणार**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या सर्व सुविधा फलटण शहरात आल्या आहेत. प्रशासकीय इमारत, पोलीस ठाणे, न्यायालय आदींच्या माध्यमातून नागरिकांचे जीवन सुकर होणार आहे. येथील विविध विकास कामांना चालना दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून पाडेगाव – साखरवाडी – जिंती – फलटण – शिंगणापूर रस्ता करण्यात येईल. माणगंगा नदीचा समावेश अमृत २ मध्ये करण्यात येईल आणि फलटण येथे न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात येईल. फलटण येथील विमानतळाच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्यात येईल. फलटण येथील रुग्णालयातील सुविधा अद्ययावत करण्यात येतील, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

सामान्य माणूस आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शासन कार्यरत आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजना आणि शेतकऱ्यांची वीज बील माफीसारखी योजना सुरू राहील. सौर ऊर्जा प्रकल्प पूर्ण झाल्यावर शेतकऱ्यांना दिवसा वीज मोफत देण्यात येईल. तसेच राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर नेण्यात येतील, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, फलटण परिसराच्या दुष्काळ मुक्तीसाठी शासनाने महत्वाचे निर्णय तसेच प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यामुळे माण, खटाव आणि फलटण परिसरातील दुष्काळ दूर होणार आहे. नीरा देवधर प्रकल्पाच्या उजव्या कालव्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. अनेक योजना मार्गी लागत असून फलटणच्या विकासाचा मार्ग त्यामुळे खुला झाला आहे. उद्योग, वाहतूक आदी क्षेत्रातही विकासाला चालना मिळाली आहे. असे त्यांनी सांगितले.

आमदार सचिन पाटील यांनी आपल्या मनोगतात फलटण तालुक्यात अनेक विकासकामे होत असल्याचे नमूद केले.

माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी आपल्या मनोगतात तालुका व परिसरात झालेल्या व हाती घेण्यात आलेल्या विकासकामांविषयी माहिती दिली.

जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शुभारंभ, लोकार्पण होणाऱ्या विविध विकासकामांची माहिती दिली. या १ हजार ४०० कोटी रुपयांच्या विकासकामांमुळे येथील शेती आणि उद्योग क्षेत्राला चालना मिळेल व परिसराचा सर्वांगीण विकास होईल. नीरा देवधर उजव्या कालव्याच्या दुसऱ्या टप्प्यातील कामामुळे १२ हजार हेक्टर क्षेत्रातील शेतीला फायदा होऊन शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, आमदार सचिन पाटील, मनोज घोरपडे, अतुल भोसले, राहुल कुल, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, माजी आमदार राम सातपुते आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव विरोधात क्रीडा संघटनांचा पुन्हा एल्गार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, पुणे :** तीन नॅशनल गेम्ससाठी शासनाने दिलेल्या पैशाचा हिशोब महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या महासचिवांनी शासनास दिलेला नाही.त्यामुळे राज्यातील विविध खेळ संघटनांनी एकत्र महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात पुन्हा आंदोनल केले आहे.

राज्यातील विविध संघटनांनी 'एमओए'च्या महासचिवांच्या कारभाराची चौकशीची मागणी केली आहे. पुण्यातील आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त विवेक मासाळ यांना निवेदन दिले आहे.या निवेदनात म्हटले की,महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे महासचिव नामदेव शिरगावकर यांनी गुजरात–२०२२,गोवा–२०२३ व उत्तराखंड–२०२४ येथे झालेल्या नॅशनल गेम्स करीता खेळाडुच्या खर्चासाठी महाराष्ट्र शासनाने १२ कोटी ४५ लाखांचे शासकीय अनुदान दिले होते. त्या अनुदानामध्ये महासचिव नामदेव शिरगावकर यांनी भ्रष्टाचार केल्याबाबत तक्रार काही पुराव्यासह आम्ही २१ सप्टेबर रोजी आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त विवेक मासाळ यांच्याकडे केली होती.तसेच नामदेव शिरगावकर यांसविरोधात २३ सप्टेंबर रोजी पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून २६ सप्टेंबरपर्यंत उपोषण केले होते.त्यावेळी याबाबत योग्य तो तपास करून महासचिवांवर गुन्हा दाखल करू,असे आश्वासन पुणे पोलिस प्रशासनाने दिल्यानंतर उपोषण स्थगित केले होते. सोमवारी (ता.२७) उपोषण सोडून एक महिना पूर्ण झाला. मागील एक महिन्यात आर्थिक गुन्हे शाखेतील तपास अधिकाऱ्यांनी एकदाही पोलिस तपासासाठी नामदेव शिरगावकर यांना बोलाविण्यात आले नाही. तसेच त्याबाबत कोणताच तपास केला नाही.

वास्तविक २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ७ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तपास अधिकारी




सहायक पोलिस आयुक्त विवेक मासाळ यांना राज्य क्रीडा संघटनेतील काही पदाधिकाऱ्यांसमोर फोन करून या तपासा संदर्भात माझी भेट घ्या, अशी सूचना केली होती. त्यामुळे उपमुख्यमंत्री पवार यांच्या सांगण्यावरून हा तपास थांबला असल्याची शंका आहे.

महाराष्ट्र शासनाने १२ कोटी ४५ लाख रुपयांचे अनुदान दिलेल्या महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन या खेळ संघटनेचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार आहेत.महासचिव नामदेव शिरगावकर आहेत.आजपर्यंत आम्ही महासचिवांनी भ्रष्टाचार केल्याचे समजत होतो.परंतु उपमुख्यमंत्री पवार हे शिरगावकर यांना अभय देऊ पहात असतील,तर भ्रष्ट्राचाराची संपूर्ण जबाबदारी अध्यक्ष म्हणून अजित पवार यांचीही आहे,असे पत्रात म्हटले आहे.

**अन्यथा मंत्रालयाबाहेर आंदोलन !**

आपण खेळाडूंसाठी देण्यात आलेल्या १२ कोटी ४५ लाख रुपये शासकीय अनुदान भ्रष्टाचार प्रकरणाचा तपास लवकरात लवकर करून दोशी नामदेव शिरगावकर व इतर भ्रष्टाचारी लोकांवर गुन्हे दाखल करावे अन्यथा १ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील १०० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू व क्रीडा संघटक या संदर्भातील तक्रार मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यासाठी मुंबई येथे मंत्रालयाबाहेर आंदोलन करतील,असा इशारा देण्यात आला आहे.

## संपादकीय



### नाही मिठाईला तोटा...

दसरा-दिवाळी म्हटलं की राजधानी दिल्लीचंही रुपडं पालटून जातं. 'बडी दिवाली'ला फटाक्यांमुळे होऊ घातलेल्या विषारी प्रदूषणाची भीती फुफ्फुसात वागवतानाही दिल्लीकर दिवाळीबरोबरच नंतरचे काही दिवसही मनापासून साजरे करतात. ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये दिवाळी येते तेव्हा किमान सकाळ-संध्याकाळनंतर दिल्लीच्या हवेत कोवळा गारवा जाणवायला लागतो. त्या गारव्यात एक वेगळी ऊब मिसळते ती मिठाईच्या सुगंधाची. दिवाळीच्या काही दिवस आधीपासूनच दिल्लीच्या रस्त्यांरस्त्यांवर एक विलक्षण दरवळ पसरू लागतो. मागे सुरू असलेल्या भटारखान्यांतल्या नानविध मिठायांच्या पराती पुढे दुकानांत पाहता पाहता रित्या होऊ लागतात.


मिठाईची दुकानं पदपथांवर हातपाय मोकळे करून सैलावतात! नेहमीच्या सामोसे-कचोरीच्या जोडीला पेढे, रंगीबेरंगी पेठे, बेसनाचे, मोतिचुराचे लाडू, चांदीचा वर्ख मिरवणारी काजू कतली, पिस्ता बर्फी, कलाकंद आणि कराची हलवा, श्रीखंड, जिलेबी, तोंडात टाकताक्षणी विरघळणारे रसगुल्ले व संदेश वगैरे नावं तरी किती घ्यावीत. नाना प्रकारच्या मिठायांच्या रंगात दिल्लीच्या बाजारपेठाही रंगून जातात. माऊली म्हणतात तसं- 'भोजनीं जैसे देख। तृप्ती लाहे जाय भूक' असं केवळ पाहूनच पोट भरावं अशा मिठायांच्या बॉक्सचे थवे बाजारांत विहंगू लागतात. चकली, चिवडा, शंकरपाळे, कडबोळी वगैरे मराठी फराळाचे पदार्थही आता दिल्लीत (विकत) मिळतात.

दिवाळीत कपडे, दागिने वगैरेबरोबरच मिठाईची खरेदी झाली नाही, तर काही तरी चुकल्याचुकल्यासारखं वाटतं. ऑनलाइनवर पैसे टाकले की हवी ती वस्तू घरात येत असली तरी बाजारात जाऊन खरेदी – त्यातही मिठाईची खरेदी करण्यातली मजा न्यारीच. राजधानीतले सदर बाजार, लक्ष्मीनगर, करोलबाग, खान मार्केट, साउथ एक्स्टेंन्शन, राजौरी गार्डन, कनॉट प्लेस, लाजपतनगर किंवा प्राचीन चांदणी चौकासारखे अनेकानेक बाजार दिवाळीत नववधूसारखे सजतात. रेटारेटी करणाऱ्या भयसूचक गर्दीचा, गाडीतल्या सीडीवरील किशोरी आमोणकरांच्या भूप, बसंत, पूरिया धनाश्री वगैरेंचा बडा ख्याल आणि छोटा ख्याल संपला तरी तसूभरही पुढे जाता येत नाही अशा त्या भयाण वाहतूक कोंडीचा उच्चांक वगैरे लोकांचा उत्साह कमी करू शकत नाहीत. गोल मार्केटचं कलेवा, करोल बाग, मंडी हाऊसचं बंगाली स्वीटस् व नथ्थूंज याबरोबरच चांदनी चौकातला बलजी मिठाईवाला, भैरों स्वीट्स, पीतमपुऱ्यातला गुलाब स्वीट्स, आय पी एक्स्टेन्शन व पटपडगंजच्या नागरिकांना जवळ पडणारं भाटिया स्वीटस, मालच्या रस्त्यावरचं मिठी आणि दिल्लीभरात स्थिरावलेले हलदीराम, अगरवाल आणि बिकानेरी यांच्यासह स्थानिक हलवाई अशा शेकडो दुकानांना मिठाईची झालर चढते या दिवसांत. आकर्षक पॅकिंगमधल्या मिठाईचे बॉक्स घेऊन हसऱ्या चेहऱ्यानं बाहेर पडणारे, मिठाईसाठी रांगा लावणारे, बिम्बल्डन एकेरीचा करंडक उंचवावा, तसा मिठाईचा बॉक्स हाती उंच धरून त्या भीषण गर्दीतून सहीसलामत बाहेर पडणारे ते दिल्लीकर.


ल्यूटियन्समधील बड्यांच्या बंगल्यांत तर मिठाईच्या बॉक्सचा डोंगरच होतो! बालजी मिठाईवाला यांच्याकडचे बर्फी, पेढा आणि दुधाच्या केकचा सुगंध, बंगाली स्वीट हाऊसमधील रसगुल्ल्यांची कोमलता , हल्दीराम, बिकानेरवाला, ओम स्वीट्स, गुलाब आणि गोपीनाथ स्वीट्स यांसारख्या बहुतांश दुकानांमधले लाडू, काजू रोल, मालपुआ वगैरेंची चव घ्यायला तिथं एखादी चक्कर मारायलाच हवी. राजकीय नेते- पक्ष-संघटना दिवाली मिलनचे कार्यक्रम करतात. त्यात 'अरे खा लो यार, मरना तो एक दिन है ही,' असं म्हणून मनसोक्त मिठाईवर ताव मारणारे अनेकजण भेटतील!

इतिहास, संस्कृती आणि खवैय्येगिरीचा संगम असलेल्या चांदणी चौकातलं घंटेवाला मिठाईचं दुकान अलीकडं विशेष झळकलं. लाला सुखलाल जैन यांनी स्थापन केलेल्या या दुकानाला तब्बल अडीचशे वर्षांहून अधिकचा इतिहास आहे. सन १७९०मध्ये स्थापन झालेल्या घंटेवालानं जॉर्ज वॉशिंग्टन अमेरिकेचे अध्यक्ष असताना, फ्रेंच क्रांतीच्या, मोझार्टचे संगीत व्हिएन्नाच्या रस्त्यांवर प्रतिध्वनीत होताना आणि दिल्लीवर मुघल सम्राट शाह आलम (दुसरा) याचं राज्य असतानाचे दिवस पाहिलेत. सन १८५७च्या स्वातंत्र्य समराचंही हे दुकान साक्षीदार आहे. त्या काळी बादशहा मिठाई घेण्यासाठी याच दुकानात हत्ती पाठवायचा, अशी कथा आहे. सोहन हलवा, पिस्ता बर्फी, कराची हलवा, माखन चुरा यांसारखे पदार्थ ही इथली खासियत. एका आकडेवारीनुसार सणासुदीत, त्यातही दसरा- दिवाळीत दिल्लीत केवळ मिठाईची उलाढाल हजारो कोटी रुपयांची होते. देशभरात हा आकडा साडेपाच लाख कोटींवर पोहोचतो. म्हणजे विषारी फटाक्यांपेक्षा मिठाईची खरेदी करणारे जास्त दिल्लीकर आहेत, हेही सुखदच.

# विज्ञानरत्न डॉ. जयंत नारळीकर



जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण स्वर्गीय डॉ जयंत नारळीकर यांना यंदाचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानरत्न हा वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. डॉ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर का होईना हा पुरस्कार मिळाल्याने खगोलप्रेमींना कमालीचा आनंद झाला आहे कारण या पुरस्कारावर त्यांचा हक्कच होता. डॉ जयंत नारळीकर यांना हा पुरस्कार त्यांच्या हयातीतच मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता पण असो देर आये दुरुस्त आये असे म्हणत या पुरस्काराचे स्वागत करायला हवे. डॉ जयंत नारळीकर यांचे याच वर्षी २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

# हे वेगळेपण कशासाठी ?

## वाचक पत्र

भारताने पंथनिरपेक्ष शासनप्रणालीचा अवलंब केल्याने या ठिकाणी अनेक पंथ वर्षानुवर्षे गुण्यागोविंदाने नांदत आहेत, त्यांचे सण, उत्सव आनंदाने साजरे करत आहेत. भारतात सर्व पंथीयांना कायद्याचे संरक्षण आहे, प्रत्येकाला धर्मस्वातंत्र्य आहे; मात्र कायद्यासमोर सर्व समान आहेत.

असे असताना मुस्लिमांना त्यांचे वेगळेपण जपण्यास सरकारच साहाय्य करत असल्याचे दिसून येत आहे. साल २०११ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार उर्दू भाषिकांची संख्या १ लाख २५ हजारापेक्षा अधिक असलेल्या ठिकाणी 'उर्दू घर' उभारण्याची योजना साल २०२२ साली सरकारच्या अल्पसंख्यांक विभागाने आणली आहे.

ज्यानुसार ठाण्यातील भिवंडी विभागात सरकारी खर्चाने उर्दू घर उभारण्यात येणार आहे. उर्दू घरासाठी लागणारा २५०० चौरसमीटरचा भूखंड ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी नुकताच अल्पसंख्यांक विभागाच्या ताब्यात दिला आहे. या ठिकाणी उर्दू घर उभारण्यासाठी पुरेसा निधी देण्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे त्यामुळे लवकरच भिवंडी परिसरात सरकारी खर्चातून भव्य असे उर्दू घर उभारले जाणार आहे. कायद्यासमोर सर्व धर्म समान असताना अल्पसंख्यकांसाठी आज स्वतंत्र कायदे आहेत, स्वतंत्र आयोग आहे, आरक्षण आहे. आता तर सरकार ठिकठिकाणी उर्दू घरेही उभारणार आहे.

या सर्वांतून सरकार कुठेतरी बहुसंख्यांक हिंदूंवर अन्याय करत असल्याची भावना आज व्यक्त केली जात आहे. आज उर्दू घरे उभारली जात आहेत उद्या इसाई घरे उभारली जातील. अन्य पंथीयही यासाठी आंदोलने करतील. आजमितीला राज्यात गावोगावी तर शहरात गल्लीबोळांत मशिदी उभारण्यात आल्या आहेत. मदरसे आहेत असे असताना आणखी उर्दू घर कशासाठी ? भाषिक तत्वावर अशा वास्तू उभारल्या जाणार असतील तर १ लाख २५ हजारापेक्षा अधिक हिंदूंची संख्या असलेल्या ठिकाणी हिंदूंसाठी संस्कृत भवन का उभारले जात नाही. सरकार एकीकडे शाळा महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांना सर्व धर्म समानतेची शिकवण देते आणि वर्तणुकीतून मात्र बहुसंख्यांकांना सापत्न वागणूक देते अशी चर्चा यानिमित्ताने केली जात आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## जेतृत्व...

विजेत्यांचे जयकार
उतू चालले कवित्व
गुलालाची उधळण
टाळ्या घेते जेतृत्व

लेखू नये कमी मात्र
ते रनरअपचे महत्व
कधी हार कधीजीत
जाणा खेळाचे सत्व

कोण कसा खेळला
तपासून पाहे कर्तृत्व
सांघिक खेळा मध्ये
महत्वाचे असे नेतृत्व

पचवितातपराजयही
कधी घेऊनि अल्पत्व
खेळ नसे ट्रॉफीपुरता
दिसो ते अ लोलुपत्व

विजेत्या ना अहंकार
ओढवून घेती अंधत्व
खुरटू जाई बिंजाकूर
कायमहोईल वंध्यत्व

कमी होऊ नये उमेद
संपून टाके अस्तित्व
उद्याजय मिळूशकेल
वृध्दिंगतकरे दायित्व

लढा देणे वाखाणावे
कसे कुणाचे धीटत्व
एकटाळी हरलेल्यास
इतके दावावे दातृत्व

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# अंगणातील ओपीडी.. डॉक्टर पेशातील देवमाणूस..!!

दीपावली सणाच्या निमित्ताने गावाकडे जावे. चार पाच दिवस मजेत रहावे असे अनेकांना वाटते. पण मुंबईहून गावाकडे आले की, अंगणाला दवाखान्याचे स्वरूप प्राप्त होते. दिवसभर गात्यागोत्यातील मंडळींची भेट, त्यानंतर रुग्णसेवा म्हणजे मुंबई येथील सर.जे,जे,हॉस्पिटलचे अधीक्षक डॉ. मधुकर गायकवाड यांनी आपल्या केसराळी गावातील नागरिकांसाठी एक आगळा-वेगळा उपक्रम राबवला. ते गावाकडे गेले की, त्यांनी आपल्या घराच्या अंगणातच ओपीडी सुरू करून गावातील नागरिकांच्या आरोग्यविषयक अडचणी जाणून घेत त्यांनी विनामूल्य तपासणी केली.

या उपक्रमामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद फुलला आहे.समाजाच्या सर्व स्तरांतून त्यांच्या या कार्याचे कौतुक होत आहे.नांदेड जिल्ह्यातील विलोली तालुक्यातील केसराळी या लहानशा खेड्यातून महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरात आपले वैद्यकीय सेवा देत आहेत. डॉ. मधुकर गायकवाड यांनी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी घाटी वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथून एम. बी. बी. एस. व एम. डी. (मेडिसिन) पूर्ण केले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी आज देशातील अग्रगण्य सर जे. जे. हॉस्पिटल, मुंबई येथे अधीक्षक म्हणून मानाचे स्थान मिळवले आहे. जेव्हा सुट्टी मिळेल तेव्हा तर दर दिवाळीला डॉ. गायकवाड हे जेव्हा आपल्या गावी येतात. तेव्हा त्यांच्या घराचे अंगणच छोटेखानी दवाखान्यात रूपांतरित होते. कोणतेही मोठे हॉस्पिटल नाही. नाही मोठ्या इमारती. आहे फक्त आपुलकी, संवेदना आणि सेवाभाव. सकाळपासून गावातील रुग्ण त्यांच्या अंगणात गोळा होतात. ते प्रत्येकाशी

गावाकडील माणसांची ओढ असल्याने सेवा संवाद साधतात. त्यांची विचारपूस करतात आणि विनामूल्य उपचार करतात.मुंबईसारख्या महानगरात एखादा ग्रामीण रुग्ण आल्यास, डॉ. गायकवाड स्वतः पुढाकार घेऊन त्याला मदत करतात. डॉ. गायकवाड यांचा अंगणातील ओपीडी हा फक्त उपचाराचा उपक्रम नाही, तर एक सामाजिक चळवळ आहे. या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्यसेवेची नवी दिशा निर्माण होत आहे.

**मनोगत....!!**

मी मुंबईत डॉक्टर असलो तरी प्रत्येकाला आपल्या गावाची ओढ असते. आपण आपल्या गावासाठी, आपल्या माणसांसाठी काहीतरी करावे, हे माझ्या मनात नेहमी असते. ज्या गावात आपण जन्मलो त्या मातीशी, त्या माणसांशी नाळ जोडलेली आहे. म्हणूनच मी गावी आलो की असा उपक्रम घेतो. यापुढेही 'अंगणातील ओपीडी' सुरूच राहील असे मनोगत डॉ.मधुकर गायकवाड यांनी' दिले.



काल परवा दिवाळीच्या निमित्ताने गावाकडे आल्यानंतर दरदिवशी पन्नास असे आठवडा भरात डॉ. गायकवाड यांनी सुमारे तीनशे रूग्णांची तपासणी केली. दिवाळीच्या सणासुदीत सुट्टीसाठी आलेल्या डॉक्टरांनी गावातल्या नागरिकांची रुग्णसेवा हीच समाजसेवा समजून सहा दिवस आपल्या अंगणातच वैद्यकीय सेवा दिली. डॉक्टरांच्या या उपक्रमाचे बिलोली तालुक्यात चर्चा होत आहेच. पण त्यांनी केलेल्या कामाचेही कौतुक होत आहे.

रुग्ण गरीब असो की श्रीमंत असो, कास धरतात तुम्ही फक्त त्याला वाचवायची..!! अचूक निदान करण्यासाठी लावतात तुम्ही कसोटी पूर्ण प्रयत्नांची !! नाही वेळ मिळत स्वतःच्या कुटूंबाला !! रुग्ण सेवा हीच कुटुंब सेवा, अशी समजूत घालती मनाला.. !! म्हणून वाटते, डॉक्टर एक महान व्यक्तिमत्व !! रुग्णसेवा हेच त्यांच्या जिवनाचे तत्व !! डॉक्टर एक कुशाग्र बुद्धीमान व्यक्ती ! जिच्यासम नाही दुसरी प्रतिकृती. गरजू रुग्णांवर योग्य उपचार करून ठणठणीत बरे करून रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करणारा डॉक्टर पेशातील देवमाणूस गरजू गोरगरीब जनतेसाठी देशाला तसेच महाराष्ट्र राज्याला लाभलेलं रत्न, कोहिनूर हिरा म्हणजे मुंबईतील नामवंत सर जे,जे हॉस्पिटल मधील अधीक्षक पदावर कार्यरत असणारे...डॉ.मधुकर गायकवाड यांच्या विषयी...!!राज्यस्तरीय तसेच राष्ट्रपती स्तरावर मिळालेले विविध पुरस्कार एवढेच नाही तर... राज्यपाल, मुख्यमंत्री विविध राज्यातील मंत्री, आमदार, खासदार फिल्म स्टार उद्योजक,कलेक्टर एस पी... ही सर्व मंडळी डॉ. गायकवाड कडून आरोग्याची सल्ले घेत असतात डॉ. मधुकर गायकवाड सतत मराठी हिंदी न्युज चैनल वर आरोग्य विषयक चर्चासत्र विषयी माहिती प्रसारित करतात.

**- श्री. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.बेलेवाडी (मासा),**
**कागल-कोल्हापूर.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## ज्युनिअर राष्ट्रीय तायक्कॉन्डो स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय पंच प्राजक्ता अंकोलेकर हिची पंचपदी निवड



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२७, मुंबई :** ४२वी ज्युनिअर राष्ट्रीय तायक्कॉन्डो स्पर्धा कोरमंगला इनडोअर स्टेडियम, बंगलोर, कर्नाटक २०२५ मध्ये दिनांक ३० ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या ज्युनिअर राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी पंच म्हणुन रायगडची तायक्कांदो आंतरराष्ट्रीय पुमशे पंच,आंतरराष्ट्रीय पदक विजेती व साई ताईकवांडो प्रशिक्षक प्राजक्ता अंकोलेकर हिची पंचपदी निवड झाली आहे. ४२ वी जुनियर राष्ट्रीय तायक्कॉन्डो स्पर्धा २०२५ स्पर्धे साठी प्राजक्ता अंकोलकर ही २८ ऑक्टोबर रोजी बंगलोर येथे रवाना होणार आहेत. तिला या स्पर्धेसाठी रायगड तायक्कांदो असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व इतर मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या. राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ.अविनाश बारगजे, महासचिव मिलिंद पाठारे, कोषाध्यक्ष व्यंकटेश कररा, उपाध्यक्ष धुलीचंद मेश्राम, प्रवीण बोरसे,निरज बोरसे, सदस्य अजित घाडगे, सतीश खेमस्कर तसेच राष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष डॉ.इशारी गणेश व महासचिव आर.डी मंगेश कर, कर्नाटका राज्य संघटनेचे महासचिव कृष्णमूर्ती यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## सेंट मायकल्स इंग्लिश स्कूलचा खेळाडू रोशन ठाकरे मैदानी स्पर्धेत राज्यस्तरावर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत, जिल्हा क्रीडा परिषद जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुल चंद्रपूर येथे आयोजित १४ वर्षाखालील मैदानी क्रीडा स्पर्धेत ६०० मीटर धावण्याच्या शर्यतीत विभाग स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करून राज्यस्तरावर पोहोचला आहे. धावण्याच्या शर्यती मध्ये इयत्ता चौथ्या वर्गापासूनच आवड होती. त्यासाठी लागणारे कौशल्य विकसित केल्यामुळेच जिल्हा क्रीडा संकुल येथे सराव करून रोशनला यश मिळवता आले. या यशामागे वडील प्रवीण ठाकरे आणि आई जया ठाकरे तसेच मैदानी क्रीडा मार्गदर्शक, शाळेतील क्रीडा शिक्षक यांच्या सतत मार्गदर्शन, प्रोत्साहन मिळाल्याने रोशनला यश मिळविता आले. विद्यालयाचे नाव राज्यस्तरावर पोहोचवून नावलौकिक मिळवून दिल्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य विकास कोल्हेकर यांनी रोशन ठाकरे यांचा पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनीही अभिनंदन करून यश मिळवण्याकरिता शुभेच्छा दिल्या.

## अहिल्यानगर शहरात गोवंशीय जनावरांची कत्तल

### दीड लाखांचे ५३० किलो मांस जप्त, ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** शहरातील झेंडीगेट परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून ६ जणांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्याकडून १ लाख ५९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तोहिद नुर कुरेशी (वय १९, रा.डावरेगल्ली, झेंडीगेट), सोहिल इकबाल कुरेशी (वय २६,रा. सदरबाजार भिंगार, ता. जि.अहिल्यानगर), समिर शफिक कुरेशी (वय ३३, रा.सदर बाजार, भिंगार), रिजवान महम्मदहुसैन कुरेशी (वय ३६, रा.सदरबाजार भिंगार), वाशिफ मुन्नावर कुरेशी (रा.सुभेदार गल्ली, झेंडीगेट), कैफ मुन्नावर कुरेशी (रा.सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अहिल्यानगर असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

छापा टाकून १ लाख ५९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना मिळालेल्या माहितीनुसार झेंडीगेट परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करून मांस विक्री होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून मिळालेल्या माहितीनुसार पथकाने छापा टाकून १ लाख ५९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे व पोलीस अंमलदार गणेश लोंढे, विष्णु भागवत, विशाल तनपुरे यांच्या पथकाने केली.

## पनवेल मनपात भ्रष्टाचार निर्मूलनाच्या प्रतिज्ञेने दक्षता जनजागृती सप्ताहास सुरूवात



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, पनवेल :** केंद्रीय दक्षता आयोग, तसेच राज्य शासनाच्या सूचनेनुसार महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका येथे भ्रष्टाचार निर्मूलनाच्या प्रतिज्ञेने दक्षता जनजागृती सप्ताहास सुरूवात झाली. दिनांक २७ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहाची सुरुवात पनवेल महानगरपालिकेच्या सभागृहात भ्रष्टाचार निर्मूलनाच्या प्रतिज्ञेने करण्यात आली. यावेळी महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी राज्यपाल व मुख्यमंत्री यांनी दिलेला मोहिम साठी शुभेच्छापर संदेश उपस्थितांना वाचून दाखवला. यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, डॉ.वैभव विधाते, नानासाहेब कामठे, मंगला माळवे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखापरीक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, उपलेखापरीक्षक संदिप खुरपे तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.शासनाच्या अध्यादेशानुसार महानगरपालिकेकडून या सप्ताहामध्ये विविध समाजमाध्यमे तसेच प्रसारमाध्यमांद्वारे भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृती विषयक माहितीचा, माहितीपर फलकांचा प्रचार व प्रसार केला जाणार आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये या विषयी व्याख्याने, निबंधस्पर्धा, चर्चासत्रे याचे आयोजन केले जाईल.

## पारनेरमधून नागपूरकडे महाएल्गार आंदोलनासाठी ५० गाड्यांसह शेकडो भूमिपुत्र रवाना

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२७, सुपा (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती आणि शेतीमालाला हमीभाव मिळावा या मागण्यांच्या पूर्ततेसाठी नागपूर येथे दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ पासून शेतकरी संघटनेचे खा.राजू शेट्टी, अजित नवले, माजी मंत्री बच्चू कडू, माजी मंत्री रविकांत तुपकर, विजय जावंदिया यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेंच्या वतीने सरकारच्या विरोधात महाएल्गार आंदोलन पुकारले आहे. महाएल्गार आंदोलनाला भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी देखील जाहिर पाठिंबा दिला असून या आंदोलनात सहभागी होण्यासाठी ५० गाड्यांच्या ताफ्यासह शेकडो भूमिपूत्रांनी पारनेर तालुक्यातील देसवडे येथून नागपूरकडे कूच केली आहे. दरम्यान नागपूरकडे रवाना



### संतोष वाडेकर शेतकऱ्यांसह आंदोलनात सहभागी

होण्यापूर्वी भूमिपुत्रांनी शेतकऱ्यांचा सात बारा कोरा झाला पाहिजे, कर्जमाफी झाली पाहिजे या घोषणा दिल्या. तसेच ताफ्यातील प्रत्येक गाडीला झेंडा, स्टीकर लावण्यात आले होते. त्यामुळे या गाड्यांनी एकच लक्ष वेधून घेतले होते. विशेषतः या आंदोलनात सहभागी होण्याऱ्या भूमिपत्रांसाठी जेवणाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. राज्यातील विविध शेतकरी संघटनेच्या वतीने नागपूर येथे होणाऱ्या महाएल्गार आंदोलनातून शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आणि शेतीमालाला हमीभाव या विषयांची मागणी सरकारने केली जाणार आहे. त्यामुळे या आंदोलनातून सरकारला मागण्या मान्य करण्यासाठी शेतकरी संघटना भाग पाडणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातून देखील असंख्य शेतकरी सहभागी होणार आहेत. आता शेतकऱ्यांसाठी ही आरपारची लढाई होणार आहे.

यावेळी संतोष वाडेकर,अशोक आंधळे, रामदास घावटे, बबन सालके, अमोल उगले, विशाल गागरे, सुनील चौधरी, बाळशीराम पायमोडे, संतोष वाबळे, पोपट दरेकर,बाळासाहेब वाळुंज संजय भोर, नंदु साळवे चेअरमन संजय भोर, तेजस भोर, अविनाश भोर,अजित वाडेकर, काशिनाथ गोळे, रामदास साळवे, बबन भोर, सुरेश गोळे, शंकर भोर, बाळासाहेब वाडेकर, बाळासाहेब भोर, एकनाथ वाडेकर, मंजाबापू वाडेकर, नंदन भोर, संतोष गागरे, गोरख पठारे, जयवंत वाळुंज, सोपान बालवे, सतीश बागल,प्रकाश गायकवाड, दत्तात्रय झंजाड, मच्छिंद्र वाळुंज,संजय पवार यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निर्मला माता शुद्धतेचे, मातृत्वाचे आणि करुणेचे प्रतीक - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. २७ चंद्रपूर :** निर्मला माता शुद्धतेचे, मातृत्वाचे आणि करुणेचे प्रतीक आहे. या देवीच्या उपासनेतून आपल्याला जीवनातील चांगुलपणा आणि सहअस्तित्वाची प्रेरणा मिळते. आपण सर्वजण जेव्हा श्रद्धेने, प्रेमाने आणि एकमेकांच्या सहकार्याने सण साजरे करतो, तेव्हा समाजात ऐक्य आणि सौहार्द निर्माण होतो, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. प्रकाश, श्रद्धा आणि भक्तीचा संगम असलेला दीपोत्सव उत्सव मोरवा येथील निर्मला माता मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिर परिसर हजारो दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला होता. या सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून निर्मल मातेच्या दर्शनाचा लाभ घेतला. या कार्यक्रमात आ.किशोर जोरगेवार बोलत होते.

यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे, भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, राजेश वांढरे, प्रदीप लोखंडे, संतोष आक्कुलवार, विलास शेरकुरे, रमेश खुरगे आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ.जोरगेवार म्हणाले की, आज या पवित्र निर्मला माता मंदिराच्या प्रांगणात उभा राहून मला अत्यंत आनंद आणि समाधान वाटत आहे. मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने उजळलेला, भक्तिभावाने भारलेला आहे. आपण प्रत्येकाने आपल्या जीवनात



ज्ञानाचा, संस्कारांचा आणि प्रेमाचा दीप प्रज्वलित करावा. आपल्या मोरवा परिसरातील नागरिकांनी अत्यंत सुंदर आयोजन केले आहे. या परिसरातील विकासकामांसाठी आपण कटिबद्ध आहे. मंदिर परिसर अधिक सुशोभित आणि सोयीसुविधायुक्त करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील, असे यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले. मंदिर परिसर दिव्यांच्या रांगोळ्यांनी, फुलांनी आणि सजावटीच्या दिव्यांनी नटलेला होता. भक्तांनी आरत्या, भजन, कीर्तन आणि माता निर्मलेच्या जयघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय केला होता. यावेळी स्थानिक नागरिक आणि भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## किल्ले भुदरगड वर ‘आपला मावळा’ संघटनेतर्फे स्वच्छता मोहीम

### गडरक्षण हीच खरी शिवसेवा - शाहू छत्रपती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष केवळ तोंडी नको, तर त्यांच्या गडांचे रक्षण आणि संवर्धन ही आपली जबाबदारी आहे,असा प्रभावी संदेश खासदार खासदार शाहू छत्रपती यांनी दिला. खासदार नीलेश लंके यांच्या आपला मावळा संघटनेतर्फे राबविण्यात येणाऱ्या गडसंवर्धन व स्वच्छता मोहिमेचा आठवा टप्पा किल्ले भुदरगड येथे दिनांक २७ ऑक्टोबर रोजी हजारो मावळ्यांच्या सहभागात उत्साहात पार पडला. या मोहिमेचा शुभारंभ खासदार शाहू छत्रपती, आमदार जयंत पाटील व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व्ही.बी.पाटील यांच्या हस्ते झाला.

शाहू महाराज म्हणाले, गडांवरील स्वच्छता, मंदिर दुरुस्ती, सूचना फलक बसविणे हे छोटे उपक्रम असले तरी अत्यंत प्रभावी आहेत. नीलेश लंके यांनी पुढील पिढ्यांसाठी स्वच्छ,



**खासदार निलेश लंके यांचा साधेपणाचा धडा**

खासदार निलेश लंके यांचा साधेपणा धडा खासदार लंके यांच्या कार्यशैलीने प्रेरित होऊन हजारो मावळे या उपक्रमात सहभागी झाले. मात्र, त्यांनी कोणताही दिखावा न करता पुष्पनगर येथिल शाळेत मुक्काम केला. पहाटे मावळ्यांसह जयघोषात गडाकडे प्रस्थान करणारा त्यांचा साधेपणा परिसरात चर्चेचा विषय ठरला.

सुरक्षित आणि सशक्त गड सोडून देण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्यांचे प्रयत्न शिवरायांचे विचार जनमानसात रुजविणारे आहेत. आपला मावळा ही संघटना भविष्यात लाखो तरुणांना एकत्र करून शिवकार्याच्या रणांगणात उतरलेली दिसेल, असा मला विश्वास आहे. शिवनेरीपासून सुरू झालेली ही मोहीम धर्मवीर, रायरेश्वर, रामशेज, तिकोना, प्रतापगड पार करून आता भुदरगड वर पोहोचली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकोटांचा वारसा जतन करण्यासाठी हा उपक्रम आहे, असे लंके यांनी सांगितले.

गडसंवर्धनासाठी शासनाकडून विशेष निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही ही त्यांनी दिली. दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सकाळी आपला मावळा संघटनेचे टी-शर्ट परिधान केलेले हजारो युवक-युवती जय शिवराय! च्या घोषात फावडे, कुदळ, झाडू हातात घेऊन गावाकडे रवाना झाले.

यावेळी आर.के.पवार, राहुल देसाई, सत्यजित जाधव, प्रतीक पाटील, सुदेश सापळे, संतोष मेंगाने, अनिल घाटने, सुनील शिंत्रे, प्रकाश पाटील, रणधीर मोरे, निखिल निंबाळकर उपस्थित होते.

## महापालिका रुग्णालयातील आरोग्य सेवा पीपीपी करण्याच्या निर्णयाविरोधात विविध संघटनांचे जनआंदोलन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मुंबई :** मुंबई महापालिकेच्या सहा मोठ्या रुग्णालयांतील मोफत आरोग्य सेवा सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) करारांद्वारे खासगी कंपन्यांकडे सोपविण्याचा घाट पालिका प्रशासनाने घातला आहे.

या निर्णयामुळे मोफत सार्वजनिक सेवांच्या जागी सशुल्क सेवा सुरू होणार आहे. त्याचा जोरदार फटका गरीब, सर्वसामान्य आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांना बसणार आहे. परिणामी मोफत आरोग्य सेवांच्या कामकाजातील असुरक्षितता आणि सेवांची गुणवत्ता घटत असल्याचा आरोप रुग्णालये वाचवा, खाजगीकरण हटवा कृती समितीने केला आहे. या निर्णया विरोधात जनआंदोलन पुकारत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ रोजी म्युनिसिपल मजदूर युनियन, रुग्णालये वाचवा निजीकरण हटाव कृती समितीचे गिरीश भावे, अशोक जाधव, त्रिशुला कांबळे, अभय शुक्ला, डॉ.कामाक्षी भाटे, बबन ठोके आदी मान्यवरांनी मुंबई पत्रकार संघात माध्यमांशी संवाद साधला.

पालिका व्यवस्थेमध्ये आधीच २० हून अधिक पीपीपी प्रकल्प कार्यरत आहेत. त्यात अतिदक्षता विभाग, निदान केंद्रे, डायलिसिस युनिट्स आणि प्रसूतिगृहे यांचा समावेश आहे. दुसरीकडे पालिकेने नियमित कर्मचाऱ्यांची संख्या कमी करून आउटसोर्स आणि कंत्राटी भरती वाढवली आहे. ज्यामुळे सेवांची गुणवत्ता धोक्यात आली आहे आणि कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढलेला आहे.

एका पीपीपी आयसीयूमध्ये १४९ रुग्णांचा मृत्यू झाल्याने कोट्यवधींचा करार रद्द करण्यात आला. अनेक ठिकाणी डॉक्टरांची अनुपलब्धता असल्याने आयसीयू रिकामे पडतात आणि रुग्णांना बेड मिळत नाहीत. पीपीपी संचालित निदान केंद्रांमध्ये सार्वजनिक दरांच्या तुलनेत तीन ते पंधरा पट जास्त शुल्क आकारले जाते आणि पालिकेकडून पेमेंट उशिरा मिळाल्यास सेवा थांबतात.

पालिकेत ९७५ वैद्यकीय पदे रिक्त असताना फक्त मुंबईतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधून दरवर्षी सुमारे १२०० एमबीबीएस आणि १००० एमडी/एमएस डॉक्टर्स पदवीधर होऊन बाहेर पडतात. तरीही कंत्राटी कर्मचाऱ्यांना नाममात्र वेतनावर ठेवले जात आहे.

अस्पताल बचाव, निजीकरण हटाओ कृती समितीने एम पूर्व वॉर्ड (मानखुर्द-गोवंडी) परिसरात रुग्णालयांच्या खासगीकरणविरुद्ध जनआंदोलन उभे केले आहे. शताब्दी आणि लालुभाई कंपाऊंड सुपर स्पेशालिटी रुग्णालयांचे खाजगीकरण थांबवण्याची मागणी केली आहे.

अक्षराज



# दिवाळीपूर्वी अनुदान न मिळाल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांने तहसीलदारांच्या गाडीच्या काचा फोडल्या

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२७, मुदखेड :** मुदखेड तालुक्यातील प्रशासकीय इमारतीमध्ये तहसीलदार आपल्या कॅबिनमध्ये बसुन होते. दुपारी एकच्या सुमारात एक शेतकरी युवक शेती प्रश्नावर शेतकरी समस्येवर अनुदान वाटप शेतकरी समस्या या विविध शेतकऱ्यांच्या समस्या घेऊन जय जवान जय किसानचा नारे देत फावड्याने तहसील इमारतीच्या बाजूला असलेल्या तहसीलदार यांच्या शासकीय वाहनांच्या समोरील गाडीच्या काचा फोडल्या हाकेच्या अंतरावर असलेल्या मुदखेड पोलीस ठाण्यातून पोलीस ना कळवण्यात आले. लागलीच पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर महसूल




प्रशासनाच्या वतीने प्रेस नोट काढून तालुक्यातील शेतकऱ्यांना एकंदरीत आज पर्यंत माहे आगस्ट मध्ये अतिवृष्टीमुळे शेतनुकसान झालेल्या २३०००/ लाभार्थ्यांची माहिती अपलोड करण्यात आली. आज रोजी पर्यंत १९१६३ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा झाले असून गाडी च्या काचा फोडनारा तरुण साईनाथ मारोती खानसोळे मौजे वासरी या व्यक्तीच्या गट क्रं. ३७१ व ३८२ या गटातील पिकनुकसानिचे अनुदान रु ६२९० /दिपावली पूर्वीच्या त्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याचे प्रेसनोट द्वारे माहिती समोर आले आहे.

जवळपास आजपर्यंत ८५ टक्के लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान वाटप झाले असून अजून काही फार्मर आयडी असतील सामायिक क्षेत्रातील संयुक्त खाते अशा विविध लाभार्थ्यांना जनजागृती करून त्यांना अनुदान मिळवून देण्याचे मुदखेड महसूल प्रशासनाच्या च्या वतीने करण्यात येत असल्याचे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी प्रेस नोटद्वारे माध्यम प्रतिनिधींना माहिती दिली आहे.

# जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत ज्ञानमाता झरी आश्रम शाळेची चमकदार कामगिरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, पालघर :** क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य व क्रीडा अधिकारी पालघर यांच्यामार्फत जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी तारापूर विद्यामंदिर बोईसर येथे माननीय सुहास व्हनमाने (जिल्हा क्रीडा अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. ज्ञानमाता आश्रम विद्यालय,झरीच्या खेळाडूंनी या स्पर्धेत चमकदारी चमकदार कामगिरी करत सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.

४*१०० रिले प्रकारात १९ वर्षाखालील मुलगे, १९ वर्षाखालील मुली व १४ वर्षाखालील मुलगे यांनी विजेतेपद व ४*४०० स्पर्धेत १९ वर्षांखालील मुली यांनीही विजेतेपद पटकावत सांघिक प्रकारात वर्चस्व दाखविले. या सर्व खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड झाली आहे.

वैयक्तिक क्रीडा प्रकारात २०० मीटर धावणे स्पर्धेत विद्यालयाचे किरण रमेश नाईक व नंदिता रमण शनवार ह्या दोघांनी द्वितीय क्रमांक पटकावला. ६०० मीटर धावणे स्पर्धत रोशन शैलेश बारगा यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत सहभागी झालेल्या एकूण एकूण २९ खेळाडूंपैकी २० खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड होणे ही केवळ विद्यालयासाठी नाही तर संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.

विद्यालयाच्या या खेळाडूंबरोबरच दीड हजार मीटर धावणे स्पर्धेत निखिल विजय जनाथे व प्रणव सुनील कुरकुटे



त्यांनी अनुक्रमे १९ व १७ वयोगटात तृतीय क्रमांक पटकावला. दिवेश मेढा यांनी भालाफेक मध्ये व तेजल सुनील शिंगडा हिने थाळीफेक मध्ये तृतीय क्रमांक पटकावला.

विद्यालयाच्या या भरीव कामगिरीबद्दल एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी विशाल खत्री (भाप्रसे), ज्ञानमाता सदन संस्थेचे अध्यक्ष फादर निलम लोपीस, प्राचार्या सिस्टर बस्तियान फर्नांडिस यांनी सर्व खेळाडूंचे व प्रशिक्षक साहिल वांगड यांचे भरभरून कौतुक केले आहे व विभागीय स्पर्धेसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# आर्थर सीट पॉईंटकडे जाणाऱ्या रस्तयावरील खड्डे बुजवण्यासाठी प्रशासनाकडून मातीचा वापर



## सर्वत्र चिखलाचे साम्राज्य; अपघातास निमंत्रण !

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२७, महाबळेश्वर :** नुकतेच महाबळेश्वर येथे महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या महाबळेश्वर दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाच्या तयारीवर गंभीर सवाल उपस्थित होत आहेत. महाबळेश्वरमधील सर्वाधिक लोकप्रिय पर्यटनस्थळांपैकी असलेल्या 'ऑर्थर सीट पॉइंट'कडे जाणारा रस्ता अनेक महिन्यांपासून खड्ड्यांनी भरलेला असून, पावसाळ्यामुळे रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. राज्यपाल येण्यापूर्वी प्रशासनाने घाईघाईत रस्त्यावर माती टाकून खड्डे बुजविण्याचा प्रयत्न केला.

मात्र या तात्पुरत्या डागडुजीमुळे रस्त्याचे चिखलात रूपांतर झाले. परिणामी राज्यपालांनाच या चिखलातून मार्गक्रमण करावे लागण्याची परिस्थिती निर्माण झाली परीसरातील नागरिक राज्यपालांच्या स्वागतासाठी प्रशासनाने 'चिखलाच्या पायघड्या'च घातल्या अश्या प्रतिक्रीया व्यक्त करीत आहेत.

**पर्यटनस्थळाची प्रतिमा मलिन !**

महाबळेश्वर हे राष्ट्र आणि जगभरातून पर्यटकांना आकर्षित करणारे हिलस्टेशन. अशा ठिकाणाचा मुख्य पर्यटन मार्गच दुरवस्थेत असेल तर पर्यटन विकासाची मोठी थट्टाच असल्याची बूज वाढली आहे. पर्यटकांना चालणेही कठीण झाले असून वाहतूक कोंडीमुळे प्रवासाचा अक्षरशः त्रास होत आहे.

> **आवश्यक उपाययोजना !**
> - वाहतुकीसाठी समर्पित पोलीस कर्मचारी...
> - खड्डेमुक्त रस्ते तात्पुरती नव्हे तर दर्जेदार दुरुस्ती...
> - हंगामापूर्वी आढावा बैठका
> - पर्यटकांसाठी सुरक्षित व सुटसुटीत व्यवस्था...

**वाहतूक कोंडीने त्रस्त पर्यटक...**

श्रीक्षेत्र महाबळेश्वर प्रवेशद्वाराजवळील महत्त्वाच्या चौकात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत प्रचंड वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली.

**पॉईंटकडे जाणारी वाहने...**

श्रीक्षेत्र महाबळेश्वर मंदिराकडे दर्शनासाठी जाणारी वाहने दोन्ही वाहन प्रवाह एकत्र येत असल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प होत आहे.या ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नेमण्याची मागणी सर्वसामान्य नागरिक व पर्यटकांकडून होत आहे. राज्यपालांचा दौरा हा केवळ व्हीआयपी व्यवस्थेपुरता नसून प्रशासनाची त्वरेने आणि शास्त्रीय पद्धतीने काम करण्याची क्षमता मोजण्याची वेळ आहे.पर्यटन हे महाबळेश्वरचे मुख्य अर्थकारण ˘ त्यामुळे या क्षेत्रातील मूलभूत समस्या न सोडवल्यास संपूर्ण पर्यटन क्षेत्र धोक्यात येऊ शकते.

**प्रशासनावर टीका ...**

आधीच माहिती असताना ऐनवेळी घेतलेले निकृष्ट निर्णय...

व्हीआयपी दौरा असताना सुरक्षेकडे दुर्लक्ष...

महाबळेश्वरात योग्य नियोजन आणि आढावा बैठका नसल्याचा आरोप...

सातारा जिल्ह्यात चार-चार मंत्री असूनही पर्यटन हंगामात अशी दुरवस्था होणे ही शरमेची बाब असल्याचे नागरिकांचे स्पष्ट मत आहे.राज्यपाल येत असताना देखील रस्ते नीट होत नसतील, तर सामान्य पर्यटकांसाठी सुधारणा कधी होणार? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

**स्थानिकांचे व्यवसाय ठप्प...**

आर्थरसीट पॉइट रस्त्यावर मातीने खड्डे भरल्यामुळे वाहने घसरून अपघात होण्यास सुरूवात त्यामुळे हा रस्ता बंद करण्यात आला. त्यामुळे पॉइट परीसरातील व्यवसाय ठप्प झाले याचा स्थानिक नागरिकांना चांगलाच फटका बसला. पर्यटकांनवर येथील उर्दरनिर्वाह असल्यामुळे बांधकाम विभागाच्या अश्या गलथान कारभारामुळे स्थानिक व्यवसायिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला.

# हक्काची महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या पुढाकाराने गृह उपयोगी वस्तूंचे वाटप

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२७, डोंबिवली :** महाराष्ट्रातील कामगारांच्या न्यायहक्कासाठी लढणारी हक्काची महाराष्ट्र मजदूर संघटना (रजि) यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्र इमारत बांधकाम व इतर मंडळ यांच्याकडून कामगार बांधवांना गृह उपयोगी वस्तू किट संचाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे संस्थापक व अध्यक्ष माहदुसिंग महेर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शशिकांत कांबळे,




ट्राफिक सेल जिल्हाध्यक्ष दत्ता माळेकर, आणि आरपीआय महिला जिल्हाध्यक्ष मीनाताई साळवी, तेजश्री आंगणे, छायाताई कांबळे, वंदना राजपूत, मनीषा सोनकर, स्वाती कदम, वैशाली जाधव, जयश्री माने, अनिता राजपूत, एकता कामगार संघटनेचे अध्यक्ष संजय ठोंबरे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संजीवन माने, पेंटर नाका अध्यक्ष नवनाथ माने, खानदेश अध्यक्ष लोटन ठाकरे, गणेश चौधरी, अध्यक्ष कौतिक बदल, हिरा चव्हाण, अनिल राठोड, किसन झरपला, अशोक राठोड, गणेश महाजन, संतोष साबळे, भास्कर गवळी, रामेश्वर शेजुळ, किशन अवचार आदी उपस्थित होते. कामगारांच्या कल्याणासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून संघटनेच्या सामाजिक बांधिलकीचे हे उत्तम उदाहरण आहे.

# थोडक्यात

## शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धेत चंद्रशेखर कोल्हे भारतातून तिसरा




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, बुलडाणा :** भारतातील सर्वात मोठी आनलाईन व ऑफलाईन हिन्दूस्थानी शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धेत सहभाग घेत चंद्रशेखर कोल्हे हा भारतातून तबला तृतीय विजेता ठरला.

ही स्पर्धा पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत त्याने 'राग मारवा छोटा ख्याल व राग पुरिया हा बडा ख्याल' सादर करून त्या दोन्ही रागामध्ये साम्य काय व भेद काय आहे, या दोनही विषयाचे समर्पक सादरीकरण करुन व उपस्थितांची मने जिंकली. या सर्व परिक्षणातून चंद्रशेखरने तृतीय क्रमांक मिळविला. चंद्रशेखर कोल्हे हा डी.वाय.पाटील कॉलेज पुणे येथे इंजिनिअरींगच्या तृतीय वर्षाला शिकत असून तो संगीत अलंकार गायन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेला आहे. चंद्रशेखर कैलास कोल्हे तबला विशारद असून आहे. चिखली तालुक्यातील धोडप या गावातील आहे. संगीताचे ज्ञान त्याला बालपणापासूनच आई वडिलांकडून मिळाले आहे. वडील कैलास कोल्हे हे सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथे संगीत शिक्षक असून आई अनिता कोल्हे या संगीत विशारद आहे. त्याने मिळवलेल्या या यशाचे सर्वस्तरातून कौतूक होत आहे.



### ✻ नावात बदल ✻

मी, शुभम ओंकारेश्वर स्वामी, श्री. ओंकारेश्वर मल्लय्या स्वामी यांचा पुत्र, फ्लॅट नंबर १, भैरवनाथ अपार्टमेंट, अंबेगाव बक, पुणे येथे राहणारा, दिनांक २५/०९/२५ पासून माझं नाव 'शुभम ओंकार स्वामी' हे बदलून 'शुभम ओंकारेश्वर स्वामी' असे केले आहे. त्यामुळे, आता आणि पुढे सर्व कारणांसाठी मी 'शुभम ओंकारेश्वर स्वामी' या नावाने ओळखला जाईन.

### ✻ नावात बदल ✻

मी, मनिषा ओंकारेश्वर स्वामी, श्री. ओंकारेश्वर मल्लय्या स्वामी यांच्या पत्नी, फ्लॅट नं. १, भैरवनाथ अपार्टमेंट, अंबेगाव बुद्रुक, पुणे येथे राहणारी, दिनांक २५/०९/२५ पासून माझं नाव 'मनिषा ओंकार स्वामी' वरून 'मनिषा ओंकारेश्वर स्वामी' असे बदलले आहे. त्यामुळे आता आणि पुढे सर्व कारणांसाठी मी 'मनिषा ओंकारेश्वर स्वामी' या नावाने ओळखली जाईन.

### ✻ नावात बदल ✻

मी, ओंकारेश्वर मल्लय्या स्वामी, श्री. मल्लय्या स्वामी यांचा पुत्र, फ्लॅट नं. १, भैरवनाथ अपार्टमेंट, अंबेगाव बुद्रुक, पुणे येथे राहणारा, दिनांक २५/०९/२५ पासून माझं नाव 'ओंकार मल्लय्या स्वामी' वरून 'ओंकारेश्वर मल्लय्या स्वामी' असे बदलले आहे. त्यामुळे आता आणि पुढे सर्व कारणांसाठी मी 'ओंकारेश्वर मल्लय्या स्वामी' या नावाने ओळखला जाईन.



## वॉक फॉर युनिटी कार्यक्रमात नागरिकांनी सहभाग नोंदवावा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, ठाणे :** सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती साजरी करण्यात येणार आहे. या जयंतीनिमित्ताने वॉक फॉर युनिटीचे कार्यक्रमामध्ये ५ किलोमिटर वॉक दि.३० ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता साकेत मैदान येथून सुरू करण्यात येवून त्याच ठिकाणी ड्राईव्ह परत येवून पूर्ण करण्यात येणार आहे.

ही ड्राईव्ह ठाणे पोलीस आयुक्तालय व ठाणे शहरातील नागरिकांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येणार असल्याने या ड्राईव्हमध्ये ठाणे शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेवून वॉक फॉर युनिटी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन पोलीस मुख्यालय, ठाणे शहर राखीव पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.

## ४ लाखांची खंडणी मागणारा स्कूल बस चालक पोलिसांच्या जाळ्यात

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२७, काशीमीरा :** काशीमीरा परिसरात एका शाळकरी मुलाच्या अपहरणाची धमकी देऊन ४ लाख रुपये खंडणी मागण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्कूल बस चालकाला काशीमीरा पोलिसांनी केवळ २४ तासांत अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सेंट जेरोम स्कूलमधील एका विद्यार्थ्याच्या आईला एका अज्ञात मोबाईल क्रमांकावरून व्हॉट्सॲप मेसेज आला होता. त्या मेसेजमध्ये तिच्या १४ वर्षांच्या मुलाचे अपहरण केले जाईल, ते टाळायचे असेल तर ४ लाख रुपये द्यावे लागतील, असे म्हटले होते.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित महिला तात्काळ काशीमीरा पोलिस ठाण्यात दाखल झाली. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. टेक्निकल टीमने त्या मोबाईल क्रमांकाचा मागोवा घेतला, मात्र सुरुवातीला कोणतीही उपयुक्त माहिती मिळाली नाही.

तपासादरम्यान, फिर्यादी महिलेकडून अधिक चौकशी करण्यात आली असता हे स्पष्ट झाले की, त्या मुलाचा फोटो तिने आपल्या मुलाला शाळेत सोडण्यासाठी स्कूल बस चालकाला दिला होता.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी स्कूल बस चालक सदानंद बाबुराव पाट्री (वय ३७) याला ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने कोणतीही माहिती दिली नाही, मात्र कडक चौकशीनंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

तपासात उघड झाले की सदानंदकडे मोबाईल रिचार्ज आणि सिम कार्ड विक्रीची एक छोटी दुकान आहे. एक गरीब व्यक्ती तिथे सिम रिचार्जसाठी आला असता, त्याने चलाखीने त्या व्यक्तीचे सक्रिय सिम कार्ड स्वतःजवळ ठेवले आणि त्याला निष्क्रिय सिम दिले.

याच सक्रिय सिम क्रमांकावरून (९९८७१८३४१२) त्याने फिर्यादी महिलेला व्हॉट्सॲपद्वारे धमकीचा मेसेज पाठवून खंडणी मागण्याचा प्रयत्न केला.

आरोपीने आणखी ३ ते ४ पालकांना अशाच प्रकारे धमकी देऊन पैसे उकळण्याचा प्रयत्न करण्याची तयारी केली होती. मात्र, काशीमीरा पोलिसांनी तत्पर कारवाई करत मोठी दुर्घटना टाळली. पोलिसांनी आरोपीला २६ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी अटक करून पोलिस कोठडीत ठेवले असून, पुढील तपास सुरू आहे.